# जिल्हा व सत्र न्यायालय, जळगांव.
## जाहीर निविदा

जळगांव जिल्हयातील तमाम बाहय यंत्रणेद्वारे सेवा पुरविणा–या पुरवठादारांना याद्वारे कळविण्यांत येते की, अमळनेर येथील अति. जिल्हा व सत्र न्यायालय, दिवाणी न्यायालय व.स्तर, अमळनेर व दिवाणी न्यायालय क. स्तर, अमळनेर या न्यायालयातील दस्तऐवजांच्या नकलेचे काम झेरॉक्स मशिनद्वारा करण्यासाठी स्वारस्य असेल त्यांनी आपले दरपत्रक भरुन बंद पाकिटातून, पाकीटावर "बाहय यंत्रणेद्वारा झेरॉक्स करणेबाबतचे दरपत्रक" असा उल्लेख करुन, मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, जळगांव या नावाने बंद पाकीट करुन प्रबंधक, जिल्हा व सत्र न्यायालय, जळगांव, कक्ष कमांक 101 यांच्याकडेस दिनांक 11/04/2025 पर्यत कार्यालयीन वेळेत व कार्यालयीन दिवशी सादर करावीत. त्यानंतर प्राप्त झालेल्या दरपत्रकाचा विचार केला जाणार नाही. दरपत्रके दिनांक 15/04/2025 रोजी सकाळी 11.00 वाजता मा.प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, जळगांव यांचे निजी कक्षात उघडले जातील.

## सर्वसाधारण अटी व शर्ती

1. दरपत्रक स्विकारण्याचा/नाकारण्याचा अधिकार मा.प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, जळगांव यांच्याकडेस राखून ठेवण्यांत आलेला आहे. दरपत्रक भरतांना दरपत्रकात नकलेसाठी वापरण्यांत येणारा कागदाचा दर्जा हा 75 जीएसएम असावा त्यानुसार दर नमुद करुन झेरॉक्स् करणेचे दर अंकात व अक्षरी असे दोन्ही प्रकारे भरावेत.

2. दरपत्रकातील दर हे सर्व करांसह भरावे. मात्र जीएसटी टॅक्स असल्यास त्याचा दर देयकात स्वतंत्र नमुद करावा. त्याचवेळी महाराष्ट्र शासनास सेवा पुरविल्यास तरतुदीप्रमाणे सुट दिली जात असल्यास त्या अटीस आधीन राहून दरपत्रक दयावे लागेल.

3. दरपत्रक उघडण्याच्या दिवशी व नमुद वेळी दरपत्रक पाठविणा–यांनी प्रत्यक्ष उपस्थित राहावे अथवा आपला प्रतिनिधी पाठवावा अन्यथा त्यांच्या गैरहजेरीत दरपत्रक उघडण्यांत येतील.

4. उपरोक्त सेवा पुरविणा–या सेवा पुरवठादारांस जिल्हा न्यायालयाची निवड समिती ठरवून देईल त्याप्रमाणे योग्य ती बॅक गॅरेंटी विनाशर्त दयावी लागेल.

5. उपरोक्त सेवा पुरविण्यासाठी निवड समिती जी जागा उपलब्ध करुन देईल त्याच जागेत सेवा पुरवावी लागेल त्या व्यतिरिक्त इतर जागेची मागणी करता येणार नाही किंवा सेवा समाप्तीनंतर सदर जागा 7 दिवसांत खाली करुन दयावी लागेल व सदर जागेवर कोणत्याही प्रकारचा अधिकार/हक्क सांगता येणार नाही.

6. उपरोक्त सेवा पुरविणा–या पुरवठादारांस सदर जागेवरील झेरॉक्स मशिन, टयुब लाईट, फॅन इत्यादीसाठी लागणारा वीज पुरवठा होण्यासाठी स्वतंत्र सब मीटर स्वतः स्वःखर्चाने घ्यावे लागेल व त्याबाबतचे येणारे वीज देयक स्वतः अदा करुन त्याबाबतच्या पावत्या कार्यालयात जमा कराव्या लागतील. सेवा पुरवठादाराने वीज देयक अदा केले नसल्यास, अशा वेळेस सदर महिन्याचे सेवा पुरवठादाराचे झेरॉक्स् देयक कार्यालयाकडून राखुन ठेवले जाईल.

7. उपरोक्त सेवा पुरविणा–या पुरवठादारांस सेवा पुरविण्यासाठी लागणारी झेरॉक्स मशिन, उत्तम दर्जाचा कागद, टोनर व झेरॉक्स काढण्यासाठी लागणारे इतर उत्तम दर्जाचे साहित्य स्वःखर्चाने आणावे लागेल.

8. उपरोक्त सेवा पुरविणा–या पुरवठादारांस झेरॉक्स मशिन ऑपरेटर व त्यासाठी संलग्न लागणा–या कर्मचा–यांचा पगार स्वतः अदा करावा लागेल. तसेच सदर कर्मचा–यांना कार्यालयीन कामकाज करतांना काही दुखापत झाल्यास त्यास पुरवठादार जबाबदार राहील. कार्यालय त्यासाठी जबाबदार राहणार नाही.

9. उपरोक्त सेवा पुरविणा–या पुरवठादारास सदरची सेवा कार्यालयीन वेळेत दररोज 9.00 ते 7.00 या वेळेत तसेच प्रसंगी कार्यालयास गरज असल्यास सुटीच्या दिवशी सुध्दा सेवा पुरवावी लागेल. सुट्टीच्या दिवशी पुरविलेल्या सेवेबद्दल कोणताही अतिरिक्त दर आकारता येणार नाही.

10. उपरोक्त सेवा पुरविणा–या पुरवठादारास त्याचेकडील झेरॉक्स मशिन नियमित सुस्थितीत ठेवावी लागेल जेणेकरुन कार्यालयीन कामकाजावर त्याचा परिणाम होणार नाही. तसेच झेरॉक्स मशिन नादुरुस्त झाल्यास सदर झेरॉक्स मशिन दुरुस्तीसाठी येणारा खर्च, लागणारे सुटे भागांचा खर्च पुरवठादारांस स्वतः करावा लागेल.

11. उपरोक्त सेवा पुरविणा–या पुरवठादारास न्यायालयातील मुळ दस्तऐवजांशी कोणत्याही प्रकारची छेडछाड करता येणार नाही, दस्तऐवज खराब होणार नाही किंवा दस्तऐवज नष्ट होणार नाही, दस्तऐवज चोरी अथवा गहाळ होणार नाही याबाबतची दक्षता पुरवठादार यांना स्वतः घ्यावी लागणार आहे.

12. उपरोक्त सेवा पुरविणा–या पुरवठादारास झेरॉक्स प्रतींचा हिशोब ठेवण्यासाठी योग्य ती नोंदवही तयार करुन सदर नोंदवहीत दैनंदिन झेरॉक्स प्रतींचा हिशोब ठेवावा लागेल. तसेच सदर नोंदवहीवर दररोज कार्यालयीन कामकाज आटोपल्यानंतर न्यायालयाने नेमून दिलेल्या अधिका–याची स्वाक्षरी घ्यावी लागेल. व सदर नोंदवहीवरील नोंदीनुसार प्रत्येक महिन्याच्या अखेरीस कार्यालयास देयक दयावे लागेल. तसेच सदर देयकावर कार्यालयास तीन टक्के विशेष सुट दयावी लागेल.

13. उपरोक्त सेवा पुरवठा करणा–या सेवा पुरवठादारास देयक दिल्यानंतर देयकाची रक्कम अनुदान उपलब्धतेनुसार अदा केली जाईल.

14. सेवा पुरवठादाराने प्रत्येक झेरॉक्स् प्रत ही उत्तम दर्जाची पुरविली पाहिजे. सेवा पुरवठादारास केवळ उत्तम प्रतिच्याच झेरॉक्स् प्रतिंचे देयक अदा केले जाईल.

15. दरपत्रकातील दर कोणत्या तारखेपावेतो लागू राहतील किंवा कसे ? याबाबतचा स्पष्ट खुलासा दरपत्रकात करणे आवश्यक आहे.

16. उपरोक्त सेवा पुरवठा करणा–या सेवा पुरवठादाराने मुदतीत समाधानकारक सेवा न पुरविल्यास कोणत्याही वेळी व कोणतेही कारण न देता सेवा पुरवठा आदेश रद्द करण्याचा अधिकार मा.प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, जळगांव यांचेकडेस राखून ठेवलेला आहे.

17. उपरोक्त सेवा पुरवठा करणा–या सेवा पुरवठादारांस मुदत संपल्यानंतर सेवा पुरवावयाची इच्छा असल्यास मुदत संपण्याच्या 90 दिवस अगोदर कार्यालयास कळवावे लागेल. तसेच मुदत कालावधीत सेवा बंद करावयाची असल्यास 30 दिवस अगोदर सबळ कारणासह कार्यालयास लेखी कळवावे लागेल.

18. सदर करार 01 वर्षे कालावधी करीता असेल, तसेच काम समाधान कारक असल्यास मा.प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, जळगांव वेळोवेळी करार कालावधी पुढील एक

वर्षा करीता वाढवुन देवु शकतील.

19. सदरची जाहीर निविदा जिल्हा व सत्र न्यायालय, जळगांवचे संकेतस्थळ http://jalgaon.dcourts.gov.in वर पाहता येईल.

आदेशावरुन,

V.S. Karkar

प्रबंधक,
जिल्हा व सत्र न्यायालय,
जळगांव

म.जा.क./2930 /2025
जिल्हा व सत्र न्यायालय,जळगांव
दिनांक : 03/04/2025.

प्रत माहिती करीता व नोटीस बोर्डावर प्रसिध्दी करीता.

1. म. जिल्हा व सत्र न्यायालय, जळगांव.
2. म. अति. जिल्हा व सत्र न्यायालय, अमळनेर.
3. म.जिल्हाधिकारी, जळगांव.
4. म.दिवाणी न्यायाधिश व. स्तर, अमळनेर.
5. म.दिवाणी न्यायाधिश क. स्तर, अमळनेर.
6. म. तहसिलदार, अमळनेर.
7. जिल्हा व सत्र न्यायालय, जळगांवचे संकेतस्थळावर (http://jalgaon.dcourts.gov.in)